**बारामती व माढ्यात निवडणूक - एकतर्फी चर्चा फक्त मताधिक्याचीच.**

बारामती आणि माढा या दोन्ही लोकसभा मतदारसंघात लोकसभा निवडणूकीचे चित्र एकतर्फीच दिसत असून उमेदवार किती मताधिक्याने विजयी होणार याचीच फक्त चर्चा आहे.

बारामती मतदारसंघातून खासदार सौ. सुप्रियाताई सुळे प्रथमच राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवित असून त्यांच्या विरुध्द भारतीय जनता पक्षाने माजी आमदार कांताताई नलावडे यांना उमेदवारी दिली आहे. पवार आणि काकडे घराण्याचे संबंध विळ्या - भोपळ्याचे आहेत. निवडणूकीत पवार यांच्या विरुध्द काकडे घराण्यातील उमेदवार उभा राहणारच. तो तसा उभा राहिला नाही तर सर्वांनाच नवल वाटेल. याही निवडणूकीत सुप्रियाताईंना विरोधासाठी का होईना पण विरोध केलाच पाहिजे अशी अट्टाहासाची आग्रही भूमिका घेऊन माजी खासदार संभाजीराव काकडे यांच्या स्नुषा सौ. मृणालिनी काकडे अपक्ष म्हणून उभ्या राहिल्या आहेत. अर्थात त्यांची उमेदवारी तितक्याश्या गांभीर्याने कुणीही घेत नाही. त्यामुळे त्या आपली अनामत रक्कम देखील वाचवू शकतील की नाही याबाबत सारे जण साशंक आहेत. कारण अनामत रक्कम वाचायला एकूण वैध मतांच्या एक सष्ठांश एवढी मते मिळणे आवश्यक आहे. तेवढी देखील मते त्या मिळवू शकणार नाहीत अशी परिस्थिती मतदार संघात आहे.

भाजप - शिवसेना युतीतर्फे निवडणूक लढवित असलेल्या कांताताई नलावडे या बारामतीला लागून असलेल्या शेजारच्या सातारा जिल्ह्यातील रहिवाशी असून त्यांच्याकडे "बाहेरचा उमेदवार" या भावनेतून पाहिले जात आहे. विधान परिषदेत कांताताईंनी सहा वर्षे आमदार म्हणून काम केले आहे. परंतु त्यांची मुदत संपल्यानंतर भाजपच्या नेत्यांनी त्यांना पुन्हा आमदारकीची संधी दिली नव्हती. एका अर्थाने भाजपच्या नेत्यांनी त्यांचे राजकारण संपुष्टात आणले होते. सौ. सुप्रियाताईंच्या विरोधात उभा करायला भाजपला मतदार संघातला उमेदवारच मिळत नव्हता. कोणीही उभे राहिले तरी सुप्रियाताई याच विजयी होणार ही काळ्या दगडावरची रेघ असल्यामुळे येथे त्यांच्या विरोधात उभे राहायला कोणीही तयार नव्हते. बरे, बिनविरोध जागा सोडावी तर मनाचा तेवढा मोठेपणा नव्हता आणि आपल्या कार्यकर्त्यांचे करायचे काय ? विरोध तर जिवंत ठेवला पाहिजे ना, असा काहीसा उदात्त (?) विचार करून कांताताईंना जबरदस्तीने या मतदारसंघाची उमेदवारी देण्यात आली.

बारामती हा खरे तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष असलेले श्री. शरद पवार यांचा स्वत:चा मतदारसंघ. गेली 40-45 वर्षे ते या मतदारसंघातून निवडून येत आहेत. सुप्रियाताई या श्री. शरद पवार यांच्या कन्या असून त्यांना बारामतीतून उमेदवारी देण्याचे फार पूर्वीच जाहीर झालेले असल्यामुळे त्यांनी गेली दोन वर्षे या दृष्टीने मतदार संघाची बांधणी करून कामे व दौरे चालविले होते. मतदार संघातील प्रत्येक गाव व वाडी, वस्तीपर्यंत या ना त्या कारणाने

पोहोचण्याचा सुप्रिया सुळे यांनी प्रयत्न केला आहे. यशस्विनी अभियानामार्फत महिला बचत गटांसाठी त्यांनी अत्यंत प्रभावीपणे काम करून हजारो महिलांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देऊन त्यांना स्वत:च्या पायावर आर्थिकदृष्ट्या उभे करण्याचा प्रयत्न केला आहे.

मतदानात महिलांचा सहभाग हा 50 टक्के असून महिलेला मतदान करण्याची संधी आपल्याला पहिल्यांदाच मिळणार आहे अशी भावनाही महिलांमध्ये असल्यामुळे त्याचाही फायदा सुप्रियाताईंना मिळणार आहे. आपल्या वडिलांची व राष्ट्रवादी कॉंग्रेसची परंपरागत असलेली मते तर मिळणारच पण कॉंग्रेस, रिपब्लिकन, डावे, जनता दल व इतरांचीही मते मिळाली पाहिजेत या दृष्टीने सुप्रियाताईंनी कंबर कसली असून मतांचा विक्रम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालविले आहेत. मतदानासाठी लोकांनी मोठ्या संख्येने घराबाहेर पडावे आणि अधिकाधीक मतदान व्हावे यासाठी स्वत: अजित पवार हे प्रयत्नशील असून त्या दृष्टीने त्यांनी पक्षातील नेते व कार्यकर्ते यांना सूचना दिल्या आहेत. त्या दिशेने सगळी यंत्रणा उभी करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. हे प्रयत्न यशस्वी झाले आणि निवडणुकीचे डाव तंतोतंत खरे ठरत गेले तर सुप्रियाताई सुळे या मतांचा विक्रम करतील आणि देशात पहिल्या क्रमांकाच्या मताधिक्याने विजयी होतील असा जाणकारांचा अंदाज आहे.

खरेतर, देशातले पहिल्या क्रमांकाचे मताधिक्य श्री. शरद पवार यांना मिळायला हवे अशी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील सर्व कार्यकर्त्यांची भावना आहे. या दृष्टीने माढा लोकसभा मतदार संघात ते प्रयत्नही करीत आहेत. माढ्यामध्ये श्री. पवार यांच्या विरुध्द भाजपचे खासदार सुभाष देशमुख यांना उमेदवारी दिली आहे. या मतदार संघात धनगर समाजाची जवळपास पाच ते सहा लाख मते असून ही "व्होट बॅंक" आपल्यालाच मिळावी यासाठी धनगर समाजाचे नेते असलेले महादेव जानकर हे ही निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. परंतु विजयी होण्याइतकी किंवा त्यासाठी आवश्यक असणारी मते मिळण्यापर्यंत ते पोहोचू शकणार नसल्यामुळे श्री. जानकर यांना दिले गेलेले मत वायाच जाणार. तेव्हा विजयी रथाचे सारथ्य करणाऱ्या व यदाकदाचित वेळ आणि संधी व योग आलाच तर पंतप्रधान पदापर्यंत पोहोचू शकणाऱ्या श्री. शरद पवार यांना आपले मत दिलेले बरे अशी भावना मतदार संघात सर्वत्र पाहायला मिळते आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने मतदार संघात ठिकठिकाणी जे धनगर समाजाचे मेळावे झाले त्यातही बहुतेकांनी जानकरांचा या निवडणुकीत आम्ही उमेदवार म्हणून गांभीर्याने विचारच करीत नाही असे स्पष्टपणे सांगून श्री. शरद पवार यांच्या पाठीशी संपूर्ण समाज मजबुतीने व एकसंघपणे उभा राहणार असल्याचे अभिवचन दिले आहे.